# घर पाहावं घेऊन

आम्ही १९६९ साली न्यूयॉर्कला येऊन पोहोचलो. त्या आधी अफ्रिकेत युगांडाला होतो. इदी अमिनच्या राजवटीत जी पळापळ झाली त्यातले आम्ही एक!

न्यूयॉर्कची नवलाई नोकरीच्या शोधात विरून गेली. तीन पिल्ल्यांची पोटं भरायची होती. मॅनहटनच्या फेऱ्या चालू होत्या. त्यात नोव्हेंबरची कडाक्याची जीवघेणी थंडी. झक मारली आणि अमेरिकेत अवतरलो अशी अवस्था झाली. नारायणाचा धावा चालूच होता. तो काय खाटल्यावर आणून देणार काय? पण झाला एकदाचा नारायण प्रसन्न. देशी कंपनीत नोकरी मिळाली. आता हुरूप आला. मराठी माणसांची कोंडाळी रेगो पार्क किंवा ब्रायरवुडच्या खुराड्यात राहात होती. म्हटलं, कशाला त्या ट्विन्समध्ये सगळ्यांनी गर्दी करा? जाऊया ब्रुकलीनला. तिथं एका खासगी घरातल्या दोन खोल्या भाड्यानं मिळाल्या.

छोटी छोटी घरं. एकमजली जास्त. समोर एकमेकांस जोडलेल्या नऊ घरांची बैठी इमारत. याच इमारतीच्या टोकाच्या घरात मायकल, आमचा मालक राहात होता. त्याच्या शेजारच्या घरात सत्तरीला आलेल्या मिल्ड्रेड जॉन्सन राहात होती.

जॉन्सन आजी टेकीला आल्या होत्या. एकट्याच होत्या. संध्याकाळी पायरीवर गप्पा मारायला आम्ही बसत असू. बोलता बोलता जॉन्सनबाई म्हणाल्या,

'कशाला भाडं भरताय? घर घेऊन टाक तू झीला... तीन लेकरं हायेत. तुका.! करू दे मजा थोडे दिवस.. काय?'

म्हातारी होती गोरी, आयरीश. पण तिचा आवाज आणि हेल चिपळुणच्या पाडगावकरणीसारखा. आजीचं अमेरिकन इंग्रजी मी आपल्या मायभाषेत केलंय नीट समजायला.

'अगो पन येवढा पैसा कुठून आणावा?' माकाजवळ नाय फुटकी कवडी! आन पोरांच्या प्वोटात काय घालू? माझी हाडं?'

'वय वय वय... बास झाला तुझा शानपना! आरं, इकडं अमेरिकेला घर घेला पैका नाय लागत...'

'मग काय लागती.. चिंचुके?' मी म्हटलं.

'अरं ऐपत लागते ऐपत. आन हिंमत...' म्हातारीला ठसका लागला. म्हातारीनं डोळे मिटले. थांबली. मग म्हणाली,

'तुका नोकरी हाय?'

'हाय..'

'तुका पगार मिळत्यात?'

'व्हय....!!'

'बँकेत खाता असा?'

'हाय तर. पगाराचा चेक टाकतो की तिथं'

'मग झालं तर.. घेऊन टाक माझा घर...'म्हातारी नम्रपणानं बोलली.

'आँ.. म्हंजे तू घर तुझा इकणार आन मग तू खंय जाणार?' मी वेड्यासारखा प्रश्न केला.

'जाणार मसणांत. तुला काय तेची उचापत? कुटंबी मी जाईन, तू कोन मला इच्यारनार? घेतो का माजं घर? बोल?'

'इच्यारतो... बायलीला इच्यारतो.'

'आरं जा इच्यारून ये बायलीला..'

येवढं बोलून म्हातारी सटकली.

मी घरात गेलो. बायकोला हाक मारली.

'अगो.. ऐकलंस का? शेजारची म्हातारी घर विकतेय! घ्यायचं का आपण घर?'

बायको सिंकमध्ये भांडी विसळत होती. तिला नीट ऐकू आलं नसावं.

'काय म्हणालात? शेजारची म्हातारी ओकतेय?'

'अगो ओकतेय नाय. विकतेय... घर विकतेय...' मी खुलासा केला.

'अस्सं...!' हात पदराला पुसत बाईसाहेब किचनमधून बाहेर आल्या.

तिला मी जॉन्सनबाईबरोबर झालेलं बोलणं सांगितलं.

बायकोचा त्यावर विश्वासच बसेना. पैशाशिवाय अमेरिकेत घर विकत घेता येतं हेच मुळी तिला पटेना. तिचं म्हणणं असं की एकवेळ नवरा मिळेल फुकट अमेरिकेत; पण घर? मुळीच नाही.

नाहीतरी नवऱ्याचं सांगणं कोणत्या बायकोला पटतं argument केल्याशिवाय!

मी तिला समजावून सांगितलं, की नोकरी आणि बँकेत खातं असलं की

घरासाठी लोन मिळतं FHA आणि ते लोन तीस वर्षात फेडायचं असतं. ऑफिसमध्ये साठे नावाचे एक उलाढाली गृहस्थ होते. त्यांचा सल्ला घ्यायचं मी ठरवलं. दुपारी लंचच्या वेळेला मी साठ्यांना गाठलं अन् त्यांना घराची हकिकत सांगितली.

मला बाजूला घेऊन साठे हळूच आवाजात म्हणाले,

'देशमुख, तुम्ही अमेरिकेत नवीन आहांत. इथलं politics तुमच्या लक्षात येणार नाही. इथले सगळे व्यवहार उधार उसनवारीवर चालतात. अगदी बायकासुद्धा!'

मी हात जोडले साठ्यांना, म्हणालो,

'साठे महाशय, जरा हळू बोला. भिंतीला कान असतात.'

मला सर्व जगापेक्षा आमच्या चंडिकेची जास्त भीती वाटत होती. चुकूनमाकून तिच्या कानी गेलं की मी साठ्यांशी उसन्या बायकोबद्दल बोलत होतो तर मग अस्मादिकाची धडगत नव्हती.

'बरं बरं. त्याचं असं आहे देशमुख. घर घेताना आणि त्यांची किंमत ठरवताना मालकाला त्या घरातले सारखे दोष, --- सांगायचे...'

'म्हणजे दोष नसले तरीसुद्धा?' मी आपला बावळट प्रश्न विचारला.

'अहो देशमुख, आता तुम्ही राहाता तो ब्रुकलीनचा भाग जरा जुना आहे. म्हणजे साधारण ८०-८५ वर्षांपूर्वीचा. त्यामुळं तिथली घर ट्विन्स सारखी नवीन नाहीत. म्हणून घरातलं Central Heating, wiring, Hot water system जुन्या असतात. पहिल्या मालकाला त्या गोष्टी करायच्या नसतात. म्हणून आपण त्या वर्मावर प्रथम बोट ठेवायचं. कळलं?'

मी मान हलवली.

तीन बेडरूमचं हे घर. जॉन्सन बाईनं खरंच चांगलं ठेवलं होतं. सगळ्या भिंतींना सुंदर वॉलपेपर होता. स्वयंपाकघराची कॅबिनेटस नवीन होती. जॉन्सन बाई फ्रिज आणि वॉशिंगमशीन घराबरोबर ठेवून जाणार होत्या. फ्रिज आणि वॉशिंगमशीन जरी जुने असले तरी working condition मधे होते. माझी आई नुकतीच भारतामधून माझ्याकडे प्रथमच आलेली होती. घराची गोष्ट मी तिच्या जवळ बोललो. ती अगदी हुरळून गेली.

'चल.. चल आपण घर पाहायला जाऊ.' ती मागं लागली.

आम्ही तिघांनी घर पाहिलं आणि आम्हाला आवडलं. मुलीला आणि दोन मुलांना वेगवेगळ्या खोल्या होत्या. बेसमेंट finish नव्हतं. पण स्वच्छ होतं.

अडगळीचं सामान ठेवायला भरपूर जागा होती.

बोलणी करायला जॉन्सनबाई आल्या. बरोबर क्लारा नावाची एक मैत्रीण होती. ती पण म्हातारी होती.

१९७० सालात महागाई वाढलेली नव्हती. न्यूयॉर्कमध्ये घरांच्या किंमती भरमसाठ नव्हत्या. जॉन्सनबाईला घराचे तीस हजार डॉलर्स पाहिजे होते. मी तिला लगेच जुन्या Heating - A.C. System, Water System, old pipes इत्यादीची यादी सांगितली. या सर्व गोष्टी बदलायला कमीत कमी दहा हजार डॉलर्स लागतील असे म्हटल्यावर बाई नरमल्या व त्यांनी किंमत पंचवीस हजारावर आणली.

मधूनमधून माझी आई तिला मराठी आणि हिंदीमधून लेक्चर देत होती. जॉन्सनबाई मराठी-हिंदीचा मारा चुकवत आईकडे पाहून मान हलवत होत्या.

बरीच घासाघीस करून शेवटी साडेबावीस हजारावर व्यवहार जुळला.

मी बँकेकडे लोनसाठी अर्ज दिला. त्यांनी खात्यात कमीतकमी हजार डॉलर्स शिल्लक दाखवायला सांगितले. परत साठेबुवांना किस्सा सांगितला.

'अरे व्वा! तुम्ही देशमुख जिद्दीचे आहात. पहिलं घर घेणार ना? मी देतो तुम्हाला हजार डॉलर्स उसने...'

'काय? तुम्ही मला हजार डॉलर्स देणार? माझा विश्वास नाही बसत.'

'देशमुख.. मला इकडे येऊन तीन वर्षं झाली. मला कल्पना आहे. नवीन माणसाला इथं स्थिर होताना कसा त्रास होतो ते. काळजी करू नका.'

साठ्यांनी दुसऱ्या दिवशी चेक दिला. माझं लोन मंजूर झालं. अमेरिकेतलं माझं पहिलं घर असं १९७१ साली झालं.

आम्ही राहायला आलो आणि एकदा ॲटिकमध्ये चाचपडत असताना एक वाकडी काठी हाताला लागली. आणि एक जीर्ण झालेला अल्बम.

मी त्या वस्तू बायकोला दाखविल्या. तिनं काठी कोपऱ्यात ठेवली व फोटो अल्बम घेऊन पाहात बसली.

एका जुन्या जीर्ण फोटोत जॉन्सनबाई नवऱ्याबरोबर तिच्या नवीन घराच्या प्रवेशद्वारी उभी होती. त्या फोटोखाली लिहिलं होतं.

"Our First House in America - 29 November 1929"

माझी बायको स्तिमित होऊन त्या फोटोकडे बघत राहिली.

माझी जन्मतारीख होती २९ नोव्हेंबर १९२९.

*

**– दिवाकर कारखानीस**

**('मन वढाय वढाय' या पुस्तकातून)**